# रोकडविरहीत व्यवहार आणि मराठवाड्यातील बँकिंग व्यवस्थेचा एक अभ्यास

- प्रा. डॉ.ए.टी. तवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.

- प्रा. ए.डी. मडावी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना :-**

भारत सरकारने ८ डिसेंबर २०१६ रोजी ५०० आणि १००० रूपयांच्या नोटा चलनातुन बाद करण्याचा निर्णय जाहिर केला. यालाच निश्चलनीकरण असे म्हटल्या जाते. या निश्चलनीकरनामागे सरकारचा उद्देश असा होता की, देशातील काळापैसा बाहेर काढणे आणि दहशतवादासाठी होत असलेला अर्थपुरवठा थांबवणे तसेच आणखी एक उददेश असा होता की, कमीतकमी रोकड वापरणारी अर्थव्यवस्था निर्माण करणे. म्हणजेच रोकड- विरहित अर्थव्यवस्था निर्माण करणे. रोकडविरहित अर्थव्यवस्था निर्माण केल्यामुळे सर्व आर्थिक व्यवहार तपासता येवून आर्थिक व्यवहारांबाबत पारदर्शकता जोपासता येतो. निश्चलनीकरण करणे म्हणजे अशाप्रकारची कृती ज्याव्दारे एखाद्या देशाचे सरकार एक किंवा एकापेक्षा अधिक चलनाचे वैध स्वरुप व्यवहारातुन काढून घेते. या निश्चलनीकरणाच्या प्रकियेत सर्वच चलनी नोटा काढून घेणे व त्यांच्या नेमक्या तेवढयाच मूल्याच्या नव्या चलनी नोटा बाजारात आणल्या जाते अथवा सर्व जुन्या चलनी नोटांच्या बदल्यात संपूर्णपणे नविन चलनी नोटा बाजारात आणणे यांचा समावेश होतो. भारतामध्ये अशाप्रकारच्या निश्चलनीकरणाचा अवलंब १९४६ मध्ये करण्यात आला. त्यानंतर दुसरे निचलनीकरण १९७८ मध्ये करण्यात आले.

भारतासारख्या ज्या देशातील व्यवहारांसाठीच्या पायाभूत सोयीसुविधांची ग्रामीण भागात वानवा आहे. अशा देशात संपूर्णपणे रोकडविरहित अर्थव्यवस्था निर्माण करणे अशक्य आहे. याच कारणामुळे भारत सरकारचा लेस कॅश अर्थव्यवस्था म्हणजे न्युन रोकड अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. यामध्ये सर्व आर्थिक व्यवहार रोखीने न होता बरेचसे व्यवहार डिजिटल पध्दतीने व्हावेत अशी अपेक्षा आहे. असे डिजिटल पध्दतीने व्यवहार करणा-या आणि असे व्यवहार आपल्या संस्थेत, दुकानात, आस्थापनेत व्हावेत याची व्यवस्था करणाऱ्यांना बक्षिस आणि प्रोत्साहन देण्याचे भारत सरकारचे धोरण आहे.

**रोकडविरहीत व्यवहार म्हणजे काय?**

एखादया वस्तुचे मूल्य किंवा एखादया सेवेचा मोबदला, देयकांचा भरणा डेबिड कार्ड / क्रेड्रिट कार्ड या साधनांव्दारे अथवा इंटरनेटच्या आधारे बँकिंग प्रणालीचा वापर करुन किंवा मोबाईल वरील विविध ॲप्सच्या माध्यमातून केले तर त्यास रोकडविरहित व्यवहार असे म्हणतात. कोणत्याही देण्या-घेण्याच्या व्यवहारासाठी कागदी चलनांचा वापर न करता केलेल्या व्यवहारांना रोकडविरहित व्यवहार असे म्हटल्या जाते. डिजिटल पध्दतीने केलेले व्यवहार हे रोकडविरहित व्यवहार असतात. घरबसल्या आपण आपल्या सोयीनुसार संगणक अथवा मोबाईल ॲपच्या आधारे इंटरनेट आधारित प्रणालीचा वापर करुन केलेले व्यवहार म्हणजे डिजिटल व्यवहार होय.

**रोकविरहीत अर्थव्यवस्था :**

रोकडविरहीत अर्थव्यवस्था याचा अर्थ जास्तीत जास्त डिजिटल पध्दतीचा वापर आणि रोजच्या व्यवहारांत रोख रक्कमेचा कमीतकमी वापर करणे असा होतो. संपूर्णपणे रोकविरहित अर्थव्यवस्था असणारा एकही देश आज जगात नाही रोकड विरहित व्यवहाराचा अधिकाधिक वापर करणाऱ्यांमध्ये प्रगत राष्ट्रांचा समावेश होत असला तरी मुख्यत: डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन हे देश वेगाने रोकडविरहित

अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहेत. अमेरिकासारख्या प्रगत देशात सुध्दा सुमारे ४५ टक्के आर्थिक व्यवहार रोख रक्कमेत केले जातात. डेन्मार्क किंवा स्वीडन सर्व प्रथम संपूर्णतः रोकडविरहित अर्थव्यवस्था होण्याची शक्यता वर्तवली जात असली तरी अजूनही किमान पाच ते दहा वर्षे लागतील असा अर्थतज्ञांचा अंदाज आहे. स्वीडन या देशात २५ टक्के व्यवहार नो कॅश पध्दतीने होत असतात. भ्रष्टाचार कमीतकमी असणाऱ्या देशांच्या यादीत स्वीडन तिस-या स्थानावर आहे. तरी भारतात नो कॅश व्यवहारांचे प्रमाण २२ टक्के असून भारत या यादीत ७६ व्या स्थानावर आहे. या वरुन असे स्पष्ट होते की, रोखविरहित व्यवहार जितके जास्त तितका भ्रष्टाचार कमी असतो. रोकडविरहित अर्थव्यवस्थेसाठी एक अत्यावशक गरज म्हणजे आर्थिक समावेशकता ही होय. याचा अर्थ लोकांना देशातील बँकींग व्यवस्थेशी जोडून घेतले पाहिजे, एक भाग बनवले पाहिजे.

**मराठवाडयातील बँक सुविधा :**

मराठवाडयातील बहुसंख्य लोकसंख्या निरक्षर, दारिद्रय असल्याचे दिसून येते. तसेच ती ग्रामीण भागात वास्तव करीत असल्याचे दिसते. अशा मराठवाडयासारख्या प्रदेशात पायाभूत सोयी सुविधा, बँक विषयक सुविधांचा आभाव दिसून येतो. अशा प्रकारच्या प्रदेशात रोकडविरहित व्यवहारांच्या साधनेची कमतरता जाणवते. त्यामुळे रोकडविरहित अर्थव्यवस्था निर्माण करणे अशक्य होते. बँक विषयक सुविधांच्या उपलब्धत्तेवर रोकडविरहित व्यवहारांची सफलता अवलंबून असते. सन १९८१ च्या आकडेवारी नुसार मराठवाडात व्यापारी बँकांच्या एकूण शाखा १९७५ एवढया होत्या. मराठवाडयातील लोकांची संख्या व बँक शाखांची संख्या पाहिल्यास १२,००० लोकसंख्यामागे एक बँक असे प्रमाण दिसते. मराठवाडयातील लोकसंख्या विचारात घेता. ५,००० लोकसंख्यामागे १ बँक असे प्रमाण असावे असे सुचविले जाते. मराठवाडयात बँक विषयक सुविधांचा अद्यापही मोठया प्रमाणात विस्तार झाल्याचे दिसून येत नाही. त्याचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**१.सहकारी बँक :**

शेती क्षेत्राला सवलतीच्या दराने पतपुरवठा करण्याच्या दृष्टीने सहकारी बँक किंवा सहकारी पतपुरवठा संस्था हा महत्वाचा स्त्रोत आहे. सहकारी पतपुरवठा यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या भांडवलविषयक गरजा भागण्यास मदत झाली आहे. भारतात सहकारी बँकाची रचना त्रिस्तरीय स्वरुपाची आहे. गावपातळीवर प्राथमिक कृषीपतपुरवठा संस्था कार्य करतात. जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यावर्ती सहकारी बँक काम करतात. राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक ही 'शिखर बँक' म्हणून कार्य करते.

**जिल्हनिहाय मराठवाडयातील सहकारी संस्थाचे / बँकांचे वर्गीकरण**

२०१०-२०११

| जिल्हा | भू- विकास वंका | कृषी | विगरकृषी | पणनसंस्था | प्राथमिक सहकारी बँक |
|---|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | ०१ | ७०८ | ६८९ | १६ | १४ |
| उस्मानावाद | ०१ | ४७० | ३९० | ३९ | १२ |
| जालना | ०० | २६५ | १७२ | १७ | ०७ |
| नांदेड | ०१ | ९८१ | २३० | ६२ | ०८ |
| परभणी | ०० | ४५५ | १९९ | १९ | १० |
| बीड | ०१ | ७५४ | ४८९ | १४३ | १४ |
| लातूर | ०१ | ५८३ | ३७६ | १२ | १७ |
| हिंगोली | ०० | ४३० | ७१ | ०५ | ०७ |
| मराठवाडा | ०५ | ४,६४६ | २,६१६ | ३१३ | ८९ |

**संदर्भ : - सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, पुणे.**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, मराठवाडयात राज्य व मध्यवर्ती बँकेच्या एकूण ७ शाखा आहेत तर सहकारी भू-विकास बँकेच्या एकूण ५ जिल्हाशाखा आहेत. मराठवाडयातील एकूण जिल्हयांचा विचार करता हे प्रमाण कमी असल्याचे दिसते.

**२.व्यापारी बँक :** भारतात व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयकरणानंतर बँकांच्या कार्यप्रणालीत व दृष्टीकोणात परिवर्तन झाले आहे. ग्रामीण भागात शाखा विस्ताराचा मोठयप्रमाणात राबविण्यात आला. १९६९ मध्ये भारतातील

व्यापारी बँकांच्या ग्रामीण व अर्धनागरी भागातील शाखांची संख्या १८६० इतकी होती. मार्च २०११ पर्यंत शाखांची संख्या ६२,२११ पर्यंत इतकी वाढली.

**मराठवाडयातील जिल्हानिहाय व्यापारी बँकांची कार्यालये**

२०१२-२०१३

| जिल्हा कार्यालय | राज्य बँक | व्यापारी बँक | एकूण बँक कार्यालय |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | ०३ | ३८ | ४१ |
| उस्मानाबाद | ०२ | १६ | १८ |
| जालना | ०२ | २० | २२ |
| नांदेड | ०३ | २६ | २९ |
| परभणी | ०२ | १७ | १९ |
| बीड | ०३ | १२ | १५ |
| लाातूर | ०२ | १९ | २१ |
| हिंगोली | ०२ | १७ | १९ |
| **मराठवाडा** | **१९** | **१६५** | **१८४** |

संदर्भ : - १. सहकार आयुक्त मुंबई, आणि निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, पुणे.

२. भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई.

सन २०१२-२०१३ च्या मराठवाडयातील जिल्हानिहाय राज्य व्यापारी बँक कार्यालयाची एकूण संख्या १९ एवढी आहे. तर याच कालावधीतील मराठवाडयातील एकूण व्यापारी बँकांचे जिल्हानिहाय कार्यालये १६५ एवढे आहेत. मराठवाडयामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हानिहाय एकूण व्यापारी बँकांची संख्या १८४ एवढी आहे.

**निष्कर्ष -**

मराठवाडयासारख्या ज्या भागात बहुसंख्य लोकसंख्या निरक्षर आहे आणि ग्रामिण भागातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे अशा भागात बँकविषयक सोयी सुविधांची अजुनही कमतरता दिसून येते. या भागात रोकडविरहित व्यवहारांच्या यशस्वीतेसाठीच्या साधनांचा प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात अल्प इंटरनेट जोडण्या आहेत. डिजिटल व्यवहारांसाठी इंटरनेट जोडणी आवश्यक असते. ग्रामीण भागात गरीबी आणि अशिक्षितपणा या कारणामुळे मोबाईल आणि इंटनेटचा वापर फार कमी प्रमाणात केला जाते. म्हणून मराठवाडया सारख्या प्रदेशात रोकडविरहित व्यवहाराच्या व्यापकतेवर मर्यादा येतात.

**संदर्भ सूची :**

१. भारतीय अर्थव्यवस्था- प्रा. रायखेलकर / डॉ. दामजी (जानेवारी – २०१३)

२. अमोलक अर्थक्रांता – चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३. योजना मासिक - फेब्रुवारी २०१७

४. महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा-२०१२-२०१३.

५. लोकसत्ता बातमी पत्र – २७ नोव्हेबर २०१६